# <u>जाहीर निवीदा</u>

## जिल्हा न्यायालय, सांगली या कार्यालयाचे विजयनगर येथील बी-विंग इमारतीमध्ये वॉटर फिल्टर साठी वेगळे पाण्याची पाईप जोडणी करणेबाबत..

जिल्हा न्यायालय, सांगली या कार्यालयाचे विजयनगर येथील बी-विंग इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील विशेष जलदगती न्यायालय (पोक्सो कोर्ट) येथील नवीन वॉटर फिल्टर साठी छतावरील पाण्याच्या टाकीमधून पाण्याचा पुरवठा करणेसाठी तसेच फिल्टर मधून निघणारे वेस्टेज पाणी बाहेर सोडण्यासाठी पाईपची जोडणी करणेसाठी दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर कामाची चौकशी जिल्हा न्यायालय, कार्यव्यवस्थापन विभाग येथे करावी. तसेच सदर कामासाठी प्रत्यक्ष जागेवर भेट देवून सदर कामाचे अनुषंगाने योग्य ती मोजमापे कार्यव्यवस्थापन शाखेत लेखी अवगत करणे आवश्यक राहील. सदर कामासाठी लागणारे आवश्यक साहित्य व मनुष्यबळ पुरवठा करणे संबंधित संस्थेची / व्यक्तिची जबाबदारी असेल. तसेच संबंधित संस्थेने / व्यक्तिने सदरचे काम करत असताना कामादरम्यान सुरक्षितेची योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. तसेच सदर काम करत असताना कोणत्याही प्रकारची दुर्घटना, मोडतोड होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची / व्यक्तिची असेल व याबाबत हमीपत्र या कार्यालयास द्यावे लागेल.

| अ.क्र. | तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | पाईप जोडणीसाठी आवश्यकतेनुसार लागाणारे साहित्य व स्थापनेसह खर्च (साहित्य व मजूरीसह) | |

**<u>अटी व शर्ती:</u>**

1. सहभागी संस्थेने / व्यक्तिने प्रोपरायटर / स्वत:चे आधार व पॅन यांच्या स्व: छायांकित प्रती दरपत्रकासोबत सिलबंद पाकिट / लिफाफ्यात सादर कराव्यात.
2. सिलबंद लखोट्यावर '**पाईप फिटींग साठीचे दरपत्रक**' असे स्पष्ट नमूद करून दिनांक १७/१०/२०२६ रोजी कार्यलयीन वेळेपर्यत हस्तपोच सादर करावीत.
3. उशिरा आलेली किंवा ई-मेलवर पाठविण्यात आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत.
4. सदर कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम (Advance) दिली जाणार नाही.
5. दरपत्रकाच्या पडताळनीनंतर ज्या निवीदाकारास कार्यादेश दिला जाईल त्यांनी सदरचे काम तत्काळ पूर्ण करून त्याचे देयक या कार्यालयास सादर करावे. नियमाप्रमाणे देयक अदा करणेची कार्यवाही करण्यात येईल.
6. कोणत्याही कारणास्तव निविदा स्वीकारणेचा किंवा नाकारणेचा अधिकार जिल्हा न्यायालय, प्रशासनाने राखून ठेवलेला आहे.

अधिक्षक (कार्यव्यवस्थापन)
जिल्हा न्यायालय, सांगली.

जिल्हा न्यायालय, सांगली.
दिनांक:- १२/१०/२०२६.

******

प्रत - १. जिल्हा न्यायालय, सांगली यांचे सूचना फलकावर प्रसिध्द करणेसाठी.
२. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचे सूचना फलकावर प्रसिध्द करणेसाठी.
३. पोलीस मुख्यालय कार्यालय, सांगली यांचे सूचना फलकावर प्रसिध्द करणेसाठी.
४. जिल्हा न्यायालय, सांगली यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.